महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक : सीएमए-०४२३/सीआर-१०/२०२३/एकोणीस** **दिनांक : १५ सप्टेंबर, २०२३**

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय** :- महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा -२०२३ मधील अन्न व औषध प्रशासकीय सेवा परीक्षा, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या गट-अ व ब पदांच्या परीक्षा-२०२३ च्या निकालाबाबत.

**संदर्भ** :- पूर्व परीक्षा जाहिरात क्रमांक ११/२०२३ दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ व शुध्दीपत्रक क्र.सीएमए-०४२३/सी.आर.०१/२०२३/जाहिरात, दिनांक २३ ऑगस्ट, २०२३

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ४ जून, २०२३ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा -२०२३ मधील अन्न व औषध प्रशासकीय सेवा परीक्षा, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या सहायक आयुक्त अन्न, गट-अ व अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासकीय सेवा परीक्षा गट- ब परीक्षेचा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ रोजी जाहीर करण्यात आला आहे. सदर पूर्व परीक्षेतून मुख्य परीक्षेकरिता अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकासह नावांची यादी व गुणांची सीमारेषा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२.** प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांच्या पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकीच मुख्य परीक्षेसाठी विहित कालावधीत अर्ज करणा-या व परीक्षा शुल्क भरणा-या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. मुख्य परीक्षेसंदर्भातील अधिसूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

**३.** आवश्यक तपासणीनुसार अपात्र ठरणा-या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**४.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल आरक्षणाच्या / समांतर आरक्षणाच्या / इतर मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात आला आहे.

ठिकाण :- नवी मुंबई

उपसचिव (परीक्षोत्तर राजपत्रित परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.